# THE BOMBAY LOCAL AUTHORITIES CENSUS EXPENSES CONTRIBUTION ACT, 1950.

( Bom. XXIII of 1950. )

# मुंबईचा स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं खानेसुमारीच्या खर्चासाठीं अंशदान देण्याबाबत अधिनियम, १९५०

## अनुक्रमणिका.


प्रस्तावना.

कलमें

| | | पान |
|---|---|---|
| १. | लघुसंज्ञा व व्याप्ति | ६०३ |
| २. | व्याख्या. | ६०३ |
| ३. | स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं अंशदान देणें | ६०३ |
| ४. | साहाय्य देण्याची स्थानिक प्राधिकाऱ्याची जबाबदारी. | ६०३ |
| ५. | आदेश अंमलांत आणण्याचा अधिकार | ६०३ |
| ६. | नियम. | ६०४ |

# सन् १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २३*

(मुंबईचा स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं खानेसुमारीच्या खर्चासाठीं अंशदान देण्याबाबत अधिनियम, १९५०).

[१० मे १९५०]

ह्या अधिनियमांत मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६, अन्वयें अनुकूलन व रूपभेद करण्यांत आले आहेत :—

सन १९५९ चा मुंबई अधिनियम, ६८

## स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं खानेसुमारीच्या खर्चासाठीं अंशदान देण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम

ज्याअर्थीं मुंबई राज्यांत कोणतीहि खानेसुमारी करण्याच्या बाबतींत होणाऱ्या खर्चाच्या भागाबद्दल स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं अंशदान देण्यासाठीं आणि यांत यापुढें आलेल्या इतर कांहीं गोष्टींसाठीं तरतूद करणें इष्ट आहे त्याअर्थीं याअन्वयें पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत आला आहे :—

१. (१) ह्या अधिनियमास मुंबईचा स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं खानेसुमारीच्या खर्चासाठीं अंशदान देण्याबाबत अधिनियम, १९५०, असें म्हणावें. लघुसंज्ञा व व्याप्ति.

(२) तो सबंध मुंबई राज्यास लागू आहे.

२. विषयांत किंवा संदर्भांत एद्‌तविरुद्ध कांहीं नसल्यास ह्या अधिनियमांत,— व्याख्या.

(१) "खानेसुमारीबाबत अधिनियम" म्हणजे खानेसुमारीबाबत अधिनियम, १९४८.

(२) "खानेसुमारी" या संज्ञेचा अर्थ खानेसुमारीबाबत अधिनियमाच्या उपबंधांस अनुसरून केलेली खानेसुमारी असा समजावा ;

(३) "विहित" म्हणजे ह्या अधिनियमाअन्वयें केलेल्या नियमांनीं विहित केलेलें.

३. (१) कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्याच्या निधिसंबंधीं कोणत्याहि अधिनियमांत कांहींहि असलें तरी, राज्य सरकारास असा निदेश देण्याचा अधिकार आहे कीं, खानेसुमारीबाबत अधिनियम किंवा तदन्वयें केलेले नियम यांस अनुसरून केलेल्या गोष्टीबद्दल झालेल्या कोणत्याहि खर्चाच्या विहित करण्यांत येईल अशा भागाइतक्या खर्चाचा भार, असा खर्च ज्या क्षेत्रांत झाला असेल त्या क्षेत्रासाठीं किंवा त्याच्या वतीनें रचना करण्यांत आलेल्या कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्याच्या निधीवर टाकण्यांत आला पाहिजे. स्थानिक प्राधिकाऱ्यांनीं अंशदान देणें.

(२) पोट-कलम (१) अन्वयें ज्या रकमेबाबत भार टाकण्यासंबंधीं निदेश देण्यांत आला असेल तिचा हिशोब विहित केलेल्या रीतीनें करण्यांत आला पाहिजे व ती विहित केलेल्या रीतीनें देण्यांत आली पाहिजे.

४. प्रत्येक स्थानिक प्राधिकाऱ्यास खानेसुमारी बाबत अधिनियमाचें कलम ६ या अन्वयें दिलेल्या आदेशाद्वारें खानेसुमारीच्या बाबतींत जें साहाय्य देण्याविषयीं फर्माविण्यांत आलें असेल तें साहाय्य देणें त्यास भाग असेल. साहाय्य देण्याची स्थानिक प्राधिकाऱ्याची जबाबदारी.

५. जिल्हा फौजदारी न्यायाधिशाचें किंवा खानेसुमारी कार्य अधीक्षकाचें प्रतिवृत्त मिळाल्यानंतर जर राज्य सरकारची अशी खात्री झाली कीं ह्या अधिनियमाचें कलम ३ किंवा खानेसुमारीबाबत अधिनियमाचें कलम १६ याअन्वयें किंवा तदनुसार आवश्यक असलेला खर्च देण्यांत स्थानिक प्राधिकाऱ्यानें कसूर केली आहे किंवा हा अधिनियम किंवा खानेसुमारीबाबत अधिनियम याअन्वयें किंवा तदनुसार त्याजकडे आदेश अंमलांत आणण्याचा अधिकार.

---

*दिनांक १५ नोव्हेंबर १९५९ पर्यंत सुधारलेला.

सोंपविलेलें कोणतेंहि कर्तव्य बजावण्यांत त्यानें कसूर केली आहे तर, राज्य सरकारास यथास्थिति असा खर्च देण्यासाठीं किंवा असें कर्तव्य बजावण्यासाठीं त्यास इष्ट वाटेल असा आदेश देण्याचा किंवा इष्ट वाटतील अशा उपाययोजना करण्याचा अधिकार आहे.

नियम. ६. (१) राज्य सरकारास, राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारें, हृया अधिनियमाचे उद्देश पार पाडण्यासाठीं नियम करण्याचा अधिकार आहे.

(२) विशेषेंकरून व वरील अधिकाराच्या सामान्यतेस बाध येऊं न देतां अशा नियमांत पुढील सर्व किंवा कोणत्याहि गोष्टीसाठीं तरतूद करतां येईल :—

(अ) खानेसुमारी करण्याच्या बाबतींत झालेल्या खर्चाच्या ज्या भागाइतक्या खर्चाचा भार हृया अधिनियमाअन्वयें कोणत्याहि स्थानिक प्राधिकाऱ्याच्या निधींवर टाकतां येईल तो खर्चाचा भाग,

(ब) हृया अधिनियमाअन्वयें भार टाकण्यांत आलेल्या रकमांचा हिशोब ज्या रीतीनें करण्यांत आला पाहिजे व ज्या रीतीनें त्या देण्यांत आल्या पाहिजेत, ती रीत ;

(क) खानेसुमारी करण्याच्या बाबतींत स्थानिक प्राधिकाऱ्यानें कोणतेंहि कर्तव्य ज्या रीतीनें व ज्या मर्यादेपर्यंत बजावलें पाहिजे ती रीत व ती मर्यादा.

(३) या कलमान्वयें राज्य सरकारनें केलेले सर्व नियम ते केल्यानंतर शक्यतों लवकर, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यांत आले पाहिजेत आणि ते अशा रीतीनें ज्या अधिवेशनांत ठेवण्यांत आले असतील त्या किंवा त्याच्या लगतपुढील अधिवेशनांत राज्य विधान मंडल त्यांत जे फेरफार करील त्या फेरफारांना ते अधीन असतील.